Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 26/08/2025**

# Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या वाटच्या, आतल्या वाटच्या... आपलं महानगर | My महानगर.com www.mymahanagar.com

## दिनविशेष

### साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते अनिल अवचट



अनिल अवचट हे मराठीतील प्रसिद्ध लेखक, समाजसेवक, चित्रकार आणि पत्रकार होते. त्यांचा जन्म २६ ऑगस्ट १९४४ रोजी पुणे जिल्ह्यातील ओतूर येथे झाला. ते पुण्याच्या बी. जे. मेडिकल कॉलेजमधून एम.बी.बी.एस. झाले. अवचट हे पुण्यातील मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्राचे संचालक होते. त्यांनी आपल्या पत्नी डॉ. सुनंदा अवचट यांच्या सहकार्याने व्यसनमुक्तीची शोधलेली अनोखी पद्धत ही जगभरातील अनेक व्यसनमुक्ती केंद्रांमध्ये वापरली जाते.

सामाजिक क्षेत्रातील अनुभवाशी निगडित अशा प्रकारचे लेखन साधना साप्ताहिकातील वेध या सदरातून त्यांनी केले. साधना व पुरोगामी सत्यशोधक या त्रैमासिकाचे संपादनही त्यांनी केले. युक्रांदला अर्पण केलेले पूर्णिया हे बिहारच्या समाजदर्शनाविषयीचे त्यांचे पहिले पुस्तक १९६९ मध्ये प्रकाशित झाले. वेध, हमीद, अंधेरनगरी, निपाणी, छेद, माणसं, संभ्रम, वाघ्यामुरळी, कोंडमारा, गर्द, धागे आडवे उभे, गर्द, धार्मिक, स्वत:विषयी, अमेरिका, कार्यरत, आप्त, छंदाविषयी, प्रश्न आणि प्रश्न, जगण्यातले काही आणि मजेदार ओरिगामी, पुणे हवेसे, लाकूड कोरताना, सरल-तरल, बहर शिशिराचा, अमेरिकेतील फॉल सीझन इत्यादी त्यांची प्रकाशित झालेली पुस्तके आहेत. त्यांची आयोवा विद्यापीठातर्फे आंतरराष्ट्रीय लेखक परिषदेमध्ये (१९८८) भारतातर्फे निवड झालेली आहे. याशिवाय त्यांना फाय फाऊंडेशन पुरस्कार, अनंत भालेराव स्मृती पुरस्कार, लाभसेटवार पुरस्कार, शंकरराव किर्लोस्कर पुरस्कार, सामाजिक न्याय पुरस्कार (२००७), महाराष्ट्र शासन राज्य पुरस्कार (२००८, सृष्टीत गोष्टीत), साहित्य अकादमी बाल साहित्य पुरस्कार (२०१०), महाराष्ट्र फाऊंडेशन साहित्य जीवन गौरव पुरस्कार (२०१७) इत्यादी पुरस्कार मिळाले आहेत. व्यसनमुक्ती क्षेत्रातील कार्याबद्दल राष्ट्रपतींच्या हस्ते त्यांना दिल्लीत २६ जून २०१३ रोजी राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. अशा या प्रख्यात लेखकाचे २७ जानेवारी २०२२ रोजी निधन झाले.

Nashik Edition
Aug 26, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON * YEOLA DIST. NASHIK * CENTRAL LIBRARY

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401